# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 02/07/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर जुना एमएसईबी ऑफीस कांन्द्री कन्हान येथे दिनांक 01/08/2021 चे 09.00 वा. ते 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– आकाश धनिराम भोंडेकर, वय 25 वर्ष, रा. हरीहर नगर वार्ड क्र. 1 कान्द्री कन्हान व आरोपी क्र. 1) इरफान उर्फ चोरवा मकबुल शेख वय 19 वर्ष रा. हरीहर नगर वार्ड क्र. 1 कान्द्री कन्हान हे मित्र असुन एकाच वस्तीत राहतात. फिर्यादी हे आपले मोटरसायकलने घरी जात असता आरोपी याने आपली सायकल फिर्यादीच्या मोटरसायकल समोर आणली. त्यावरून दोघांमध्ये तोंडातोंडी वाद झाला. त्यादरम्यान आरोपीने फिर्यादिस दोन तिन थापड मारले व पाहुन घेण्याची धमकी दिली. त्यावर फिर्यादी याने आरोपीस म्हटले की, ''तुझ्या सारखे खुप पाहिले, तेरी औकात नही हैं'' असे म्हणुन फिर्यादी घरी निघुन गेला. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हा चौकात उभा असता आरोपी हा तेथे आला फिर्यादिस म्हणाला की, ''तु काल माझी औकात का काढली'' असे बोलुन मनात राग धरून फिर्यादीस जिव घेण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे छातीवर, डाव्या कंबरेवर, उजव्या हाताच्या दंडावर चाकु सारख्या शस्त्राने वार मारून जखमी केले. तसेच त्यावेळी आरोपी क्र. 1 याचा मित्र आरोपी क्र. 2 अमन पप्पु केलवार, वय 19 वर्ष, रा. हरीहर नगर वार्ड क्र. 1 कान्द्री कन्हान हा तेथे आला व त्याचा मित्र आरोपी क्र. 1 याला तेथुन पळवुन नेण्यास मदत केली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 307, 506 भादंवि. कलमवाढ 3(2)(व्हि), 3(1)(आर)(एस) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास श्री. मुख्तार बागवान, उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग कामठी हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील वडोदा येथे फिर्यादी नामे– जयेद्रं सोमाजी राहांगडाले, वय 48 वर्ष, बागडी नगर, वडोदा ता. कामठी जि. नागपूर हे श्री जी ब्लॉक कंपनी झुल्लर येथे मजुरीचे काम करतात व त्यांच्या कडे असलेली हिरो फॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच–.40/ऐजी–1788 असून ती फिर्यादीने सन 2013 मध्ये घेतली होती. दि 01/08/2021 रोजी सकाळी 10.00 वा. दरम्यान फिर्यादी हे श्री जी ब्लॉक कंपनी झुल्लर येथे काम करुन दुपारी 03.00 दरम्यान घरी आले असता घराजवळ राहणरा मुलगा आदेश वय अंदाजे 10 वर्ष हा फिर्यादीच्या घरी येवून म्हणाला की ''तुमची मोटरसायकल कोणीतरी घेवून जात आहे'' असे सांगितल्याने फिर्यादी हे लगेच घराच्या बाहेर येवून पाहीले असता मोटरसायकल दिसून आली नाही. फिर्यादीची कि. 15,000/–रू. मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र बकाल मो.नं. 9834549674 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर